प्रेसनोट दिनांक ०५/०३/२०२५

**ठाणे – भूमि अभिलेख, ठाणे येथील १) लोकसेवक चांगदेव गोविंद मोहळकर, पद – उप अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे (वर्ग –२), २) लोकसेवक श्रीकांत विश्वास रावते, पद – भूकरमापक, भूमि अभिलेख, ठाणे (वर्ग –३),यांचेविरुध्द लाचलुचपत विभागाकडून सापळा कारवाई झाले बाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | ठाणे नगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर दैनंदिनी क्रमांक ०४१/२०२५, वेळ १८:३६ दिनांक ०५/०३/२०२५, |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | १) लोकसेवक चांगदेव गोविंद मोहळकर, पद – उप अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे (वर्ग –२),<br>२) लोकसेवक श्रीकांत विश्वास रावते, पद – भूकरमापक, भूमि अभिलेख, ठाणे (वर्ग –३), |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | १,००,०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | ७५,०००/– रूपये (तडजोडअंती) |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांनी त्यांचे शासकीय प्रलंबित कामाच्या अनुषंगाने लोकसेवक श्रीकांत रावते, भुकरमापक (वर्ग – ३) व लोकसेवक श्री. चांगदेव गोविंद मोहळकर, पद – उप अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे (वर्ग –२), हे लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असलेबाबत तसेच लोकसेवक चांगदेव गोविंद मोहळकर, यांनी सदर कामाबाबत जमिन मोजणी करून देण्यासाठी यापूर्वी एक लाख पंच्याण्णव हजार रूपये लाच घेतल्याबाबत दि. २७/०२/२०२५ रोजी तक्रार देण्यात आली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी कारवाई केली असता यातील तक्रारदार यांचेकडे लोकसेवक श्रीकांत विश्वास रावते पद – भूकरमापक, यांनी १,००,००/– रु. लाचेच्या रकमेची मागणी करुन तडजोडअंती ७५,०००/–रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे तसेच लोकसेवक मोहळकर यांनी त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचेकरीता लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले त्याअनुषंगाने दि. ०५/०३/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्रीकांत रावते, भुकरमापक, भूमि अभिलेख, ठाणे यांना ७५,०००/– रु. मागणी लाचेची रक्कम स्विकारताना दिनांक ०५/०३/२०२५ रोजी १६.२० वा. रंगेहात पकडण्यात आले असून लोकसेवक श्री. चांगदेव गोविंद मोहळकर, पद – उप अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे (वर्ग –२), यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. |

मार्गदर्शन अधिकारी – **१. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम – ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अ‍ॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्‌अ‍ॅप् क्रमांक – ९९३०९९७७००

**( धर्मराज सोनके )**
पोलीस उप अधीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे.